**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,**
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दूरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८ फॅक्स क्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
**(आस्थापना शाखा)**

**तातडीचे / स्मरणपत्र-१**

जा.क्र.आस्था-१/पदोन्नती स्विकारण्याबाबत माहिती/२०२३/ 9270 पुणे, दिनांक- 21 /०७/२०२३.

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोहवा ते सपोफौ/०१/२०२२/१५२०६/२०२२, दि.२४.११.२०२२
२. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/आदेश-०१/२०२२/१५२०८, दि.२४.११.२२
३. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/आदेश-०२/२२/१५४७३, दि.१.१२.२०२२
४. या कार्यालयाचे जा.क्र. आस्था-१/पोहवा ते सपोफौ/०२/१५४७१/२०२२, दि.१.१२.२०२२
५. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोहवा ते सपोफौ/०३/२६७/२०२२, दि.७.१.२०२३
६. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/०३/२०२३/३५९९, दि.१३.४.२०२३
७. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/०३/२०२३/४१८७, दि.२४.४.२०२३
८. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पोहवा पदोन्नती/०४/२०२३/५६४५, दि.२४.५.२०२३
९. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/चापोना ते चापोहवा पदोन्नती/०१/२०२२/७१७३, दि.१५.६.२०२३
१०. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोहवा ते सपोफौ/०३/२०२२/७१७९/२०२२, दि.१५.६.२०२३
११. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/चापोना ते चापोहवा पदोन्नती/०१/२०२२/७९५७, दि.२८.६.२०२३
१२. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोहवा ते सपोफौ/०३/२०२२/७९५५/२०२२, दि.२८.६.२०२३
१३. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/चापोहवा ते चासपोफौ/०३/२०२२/७१७१/२०२२, दि.१५.६.२०२३
१४. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पोना ते पाहवा पदोन्नती/०१/२०२२/७१७२, दि.१५.६.२०२३
१५. या कार्यालयाचे जा.क्र.आस्था-१/पदोन्नती स्विकारण्याबाबत माहिती/२०२३/८७५६, दि.१३.७.२०२३

**विषय :-** **पदोन्नती स्विकारले बाबतची माहिती सादर करण्याबाबत...**
**पोना ते सपोफौ व चापोना ते चासपोफौ यांच्या पदोन्नतीबाबत.**

*****

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भित आदेशान्वये पदोन्नती दिलेल्या अंमलदारांपैकी ज्या अंमलदार यांना सदरची पदोन्नती स्विकारण्याची इच्छा नाही / स्विकारलेली नाही. अशा अंमलदार यांचे लेखी अर्ज सात दिवसांत या कार्यालयांस सादर करण्याबाबत संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घेण्याबाबत तसेच पदोन्नती कार्यभार स्विकृत केल्याच्या दिनांकासह अहवाल संबंधित प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास सादर करण्याबाबत संदर्भीत आदेशान्वये कळविण्यात आलेले होते. परंतु तसा पूर्तता अहवाल अद्यापर्यंत प्राप्त झालेला नाही.

संदर्भाधिन आदेशातील पदोन्नती दिलेल्या अंमलदारांपैकी जे पोलीस अंमलदार सद्य:स्थितीत इतर घटकांत प्रतिनियुक्तीवर आहेत, अशा अंमलदारांच्या संबंधित प्रतिनियुक्तीच्या घटकांने त्यांच्याकडे मंजूर संख्याबळानुसार सामावून घेतल्यानंतरच त्यांना पदोन्नतीचा परिणाम देय राहील असे कळविण्यात आलेले होते. संबंधीत अंमलदार ते पदोन्नती स्विकारण्यास ईच्छुक आहे किंवा नाही याबाबत त्यांच्याकडून लेखी निवेदन घेवून त्यांना पदोन्नतीवर हजर करून घेतलेबाबतचे रिपोर्टसह पदोन्नती आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्यांचा आत या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच संबंधित प्रतिनियुक्तीच्या घटकाने संबंधीत पदोन्नती दिलेल्या अंमलदारास सामावून घेतले नाही, तर सदर अंमलदारांस या घटकात पदोन्नतीवर हजर होणासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. असे कळविण्यात आलेले होते, परंतु तसा अहवाल अद्यापर्यंत प्राप्त झालेला नाही.

पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदार यांनी त्यांचेपैकी एखाद्या अंमलदारांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. ३०३/का.१२, दिनांक १२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार चालु वर्षाच्या पदोन्नती निवडसूचीवरुन कमी करण्यात येईल. व त्यापुढील दोन वर्षाच्या निवडसूची मध्ये त्यांचे नाव समावेश करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच त्यांना कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

वरिल संदर्भाधिन आदेशामधील पोलीस अंमलदार यांनी सदची पदोन्नती स्विकारली आहे किंवा नाही. याबाबत या कार्यालयास काहीही कळविलेले नाही. तरी संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारीली आहे किंवा नाही याबाबत या कार्यालयास दि.१४.७.२०२३ पर्यंत कळविण्यबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच, ज्या अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारलेली नाही. त्यांचे रिक्त पदावर त्यांच्या पुढे सेवाजेष्ठतेने जे पोलीस अंमलदार आहेत. त्यांना पदोन्नती देण्यात येईल. याबाबत संबंधित प्रभारी अधिकारी यांनी पदोन्नती झालेल्या पोलीस अंमलदार यांना लेखी समज देणेत यावी, व सदरची माहिती दिलेल्या वेळेत सादर करण्याबाबत कळविण्यात आलेली होती.

परंतु सदरची माहिती अद्याप पर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तरी संबंधित हजेरी मेजर यांनी ज्या पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारलेली नाही किंवा स्विकारलेली आहे. याची माहिती घेऊन स्वत: या कार्यालयास दिनांक २५.७.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आमचे दलनामध्ये उपस्थित रहावे जर हजेरी मेजर दिलेल्या दिनांकास वेळेस उपस्थित राहीले नाहीत तर त्यांचे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. आणि संबंधित प्रभारी अधिकारी यांचे पोलीस ठाण्याच्या कामकाजावर नियंत्रण नाही असे गृहित धरुन तीव्र ना पसंती व्यक्त करण्यात येईल.

( श्रीकांत पाडुळे )
पोलीस उप-अधीक्षक मुख्यालय,
पोलीस अधीक्षक कार्यालय , पुणे ग्रामीण.

**प्रति,**

सर्व संबंधीत पोलीस अंमलदार यांना मार्फत संबंधीत प्रभारी अधिकारी पोस्टे / शाखा
प्रभारी अधिकारी, मंचर पो.स्टे. पुणे ग्रामीण

**प्रत,**

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पुणे ग्रामीण. / पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण.

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव,**

प्रमुख लिपीक, लेखा शाखा (०२) प्रतीत/ जिल्हा पोलीस प्रसिध्दी पत्रक.
प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण. (ई-मेलद्वारे प्रसिध्दीकरिता)
प्रभारी अधिकारी, सायबर पोस्टे, पुणे ग्रामीण. (संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता)
आस्थापन शाखा, कार्यासन क्र. ५,४.

**प्रत सस्नेह अग्रेषित,**

अपर पोलीस अधीक्षक, बारामती विभाग / पुणे विभाग, पुणे ग्रामीण./पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा विभाग, पुणे/ पोलीस अधीक्षक, ना.ह.स. पुणे /प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा / नानविज दौंड/ तुरची तासंगाव, सांगली

**प्रत सविनय सादर,**

मा.अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा अपर पोलीस महासंचालक,दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस अधीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे